Indian Streams Research Journal
ISSN: 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 11 | December - 2016

"खानदेशी स्त्रीगीते एक मूल्य संस्कार"

प्रा. अरुण डी. मोरे.
मराठी विभाग, पंकज कला महाविद्यालय,चोपडा. जि.जळगांव.

प्रस्तावना

खानदेशी स्त्री लोकगीतांचा हा मौखिक वारसा ग्रामीण भागात आजही जिवंत आहे. हा मौखिक स्त्री लोकगीताचा वारसा जतन करणे त्यातील भाव सौंदर्य कल्पना विलास, सर्जनशिलता जतन करणे या गीतातील रसमयता भावी पिढीसाठी संकलित करुन टिकवणे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. या खानदेशी स्त्री लोकगीतातून त्या काळाचा समाज व्यवस्थेतील व कुटुंब संस्थेतील स्त्रीचे असणारे स्थान याचा परिचय होतो त्याच बरोबर रुढी, पंरपरा व जीवन दर्शन यावर प्रकाशझोत पडतो. म्हणून ही स्त्रीगीते अतिशय महत्वाची आहे. या स्त्री लोकगीतांतून स्त्रियांनी जीवनावर अतिशय सुंदर व तरल भाष्य केले आहे. जीवन वाद व कलावाद या संगमातून या स्त्री गीतांना कला मुल्य लाभले आहे. कला मुल्यांबरोबरच जीवन मुल्य सुध्दा त्यांच्या गीतांतून दिसून येतात. ही स्त्री नातीगोती, मातापिता, सासूसासरा, देव्हारादेव यांना जपतांना दिसते एका गीतात ती म्हणते -

उभी गली जाऊ पाटपोट झाकुनी
मर्जीनं वागावं आयबानं नाव राखूनी
उभी गली जाऊ वर करुना पापनी
पिता मन्हा वाघ त्यानी जीवले धासनी

पाठपोट झाकुन आशीलाच्या बेटीने कुलवंताच्या सुनने आणि खानदानी नारीने चारित्र्य सांभाळावे, नितिमुल्ये, सामाजिक मुल्ये व कौटुंबिक मुल्ये ही बंधन नसून मर्यादा म्हणून निदर्शनास येतात.

पाया पडी पडी डोकं नही झिजस
खानदानी नारीले नही सांगनं पडस

आज व्यक्तिस्वातंत्र्याच्या अतिरेकात मूल्य व चारित्र्य धोक्यात येत आहे. स्त्रिया श्रमाची पुजा करतात जात्याला ईश्वराची उपमा देतात. स्त्रियांची ही गीते सभ्यतेचे व संस्कृतीचे वेद आहेत. अमृतकुंभ आहेत या स्त्रीगीतातून माणूसपण साकारत गेले आहे. समाजाला स्त्री गीतातून होणाऱ्या संस्काराची गरज आहे. स्त्री गीतांनी दिलेले संदेश आजच्या धावत्या युगातल्या जीवघेण्या स्पर्धेत विफल मनस्थितीत जीवन जगणाऱ्या उध्वस्त मनाला मार्गदर्शक ठरतील स्त्री गीतातून प्रकट झालेली मानवी मुल्ये घराचे मंदिर होण्यासाठी व अंगणाचे संस्कार केंद्र होण्यासाठी उपयुक्त ठरणार आहेत. ग्रामीण भागातील या स्त्री गीते मानवी जीवन आनंदी करण्यासाठी प्रेरणा देण्यासाठी संजीवनी ठरणाऱ्या आहेत. म्हणून त्या जतन करणे काळाची गरज आहे. तरच रुढी परंपरा, संस्कार, संस्कृत तेवत राहणार आहे. या स्त्री गीते माणुसकीचे अमृतस्त्रोत आहेत. खानदेशी लोकगीतात ग्रामीणांना चैतन्य देण्याचे सामर्थ्य आहे. ही लोकगीते संस्कारक्षम आहेत. समूहमनाचे व्यापाराचे आकलन या लोकगीताद्वारे होते. खानदेशी लोकगीताच्या समृध्दतेमुळे वाङःमयीन संपन्नतेच आनंद अभ्यासकाला मिळेल मधुर व लयबध्द असल्यामुळे परंपरेने टिकून आहेत.

खानदेशी स्त्रीचे लोकगीते ही कवितेपेक्षा निराळी आहेत. ही लोकगीते लोकसमूहाच्या संस्कृतीचे चित्र असते. ही लोकगीते आशयसंपन्नतेमुळे व देखण्या शब्दांच्या नजाकतीमुळे दीर्घजीवी ठरतात. ही स्त्रीगीते लोकसाहित्याचा आत्मा आहे. या आत्मचरित्रातून स्त्रवणारे विविध भावनिर्झर मनुष्यमात्राच्या जीवनप्रणालीचे, प्रकृतीचे, प्रवृत्तीचे प्रभावी द्योतक ठरतात. खानदेशी स्त्रीलोकगीते गाऊन म्हटली जातात. या लोकगीताच्या सादरी करणाच्या काही विशिष्ट पध्दती असतात या पध्दती परंपरेने चालत आलेल्या असतात. खानदेशी लोकगीते लोकसमूहाची मानली जातात. या

लोकगीतांचा कर्ता अनामिक असतो. खानदेशी लोकगीतांची निर्मिती व्यक्तिची असली तरी ती संपत्ती समूहाची बनते. खानदेशी लोकगीतांना काळाचे बंधन नाही ती त्या काळातील आहे. अभिरांच्या लोकगीतातून जीवन व्यवहाराचे रुढी, पंरपरा, आचार, विधी, संकेत या लोकतत्वाचे दर्शन घडते. खानदेशी स्त्री लोकगीतांची निर्मिती कशी होते याविषयी संदिग्ध मते कशी व्यक्त होतात. खानदेशी लोकगीते गातांना ओव्याची आवश्यकता नसते. खानदेशी लोकगीतांचा श्रोता हा गायकही असतो आणि गायक हा श्रोता देखील असतो. बऱ्याचदा समूहाने लोकगीते गायली जातात. खानदेशी लोकगीतांमध्ये यमक आणि अनुप्रास अलंकार भरपूर आढळतात. हे अलंकार आपोआप गेय्य पध्दतीमुळे आलेले असतात. ओढूनताणून अलंकार निर्माण करण्याच्या हेतूने खानदेशी लोकगीतात अलंकाराचा वापर होत नाही. खानदेशी स्त्री लोकगीतांमध्ये रचनेची कृत्रीमता नसते. खानदेशी स्त्री लोकगीतांच्या साथीला बऱ्याचदा वाद्यांचा अभाव जाणवतो. क्वचितच एखादे वाद्ये लोकगीतांच्या सोबत असते. खानदेशी लोकगीतांमधून अडाणी लोकांच्या सामर्थ्यशाली प्रतिभेचे दर्शन घडते. खानदेशी लोकगीतांमधून लोकांचे सामर्थ्य अध्यात्मिक जाणिवाबरोबरच भौतिक जाणीवा इहवाद जाणवतो. खानदेशी लोकगीते परंपरेने चालत येतात. त्याला पारंपरिक पध्दतीने, मौखिक परंपरेने टिकवले जाते. त्यामुळे खानदेशी लोकगीतांमधून जुन्या प्रथा रुढी शब्द संपत्ती विषयी माहिती मिळते. खानदेशी लोकगीतांमधून लोकभावना लोकविचार आणि लोकमनाचे मर्म सापडते. खानदेशी स्त्री लोकगीतातून खानदेशी लोकसंस्कृतीचा इतिहास पहायला मिळतो. खानदेशी स्त्री लोकगीतावर लोकसमूहाचा प्रभाव जाणवतो. खानदेशी लोकगीतांचे स्वरुप, समूह परत्वे, जाती परत्वे, प्रदेश परत्वे जरी बदलत असले तरी त्यातील मुळ गाभा कायम असतो. खानदेशी लोकगीतामध्ये ध्रुवपदाची पुनरावृत्ती असते खानदेशी स्त्री लोकगीतांची निर्मिती मागील प्रेरणा बहुविध आहे. ही खानदेशी स्त्री लोकगीते मधुर लयबध्द आणि तालबध्द असल्यामुळे परंपरेने टिकून आहेत.

चोपडा तालुका हा ग्रामीण भागाशी संलग्न असलेला तालुका आहे. ग्रामीण भागातील स्त्री-पुरुष शेतीवर उपजिवीका करणारे आहेत. शेतीवर अवलंबून असलेले कुटुंब परंपरेने रुढी, परंपरा जपत जीवन कंठत असतात. चोपडा तालुक्यातील स्त्रियांची लोकगीते ही इथल्या मातीतून पाण्यातून तरारुन आलेली आहेत. जसे -

दुबया पावया भाऊ बहिनीले आसावा,
रुपयाना खन एक रातना इसावा
झाडना बिगर गाव दिखस उघडं
पाठना बंधु बिगर कोन्ही लेयेना लुगडं
सरनं दयनं मागे उरतात पाच गहू
मी भाऊनी बहिन, भाऊले वह्या गाऊ

पारंपरिक जीवन कंठणारी बहिण भावाला उद्देशून म्हणते बहिणीला माहेरात भाऊ असलाच पाहिजे भावाला बहिणीचा कळवळा येतो बहिण भावाकडून माहेरचा आहेर (साडी-चोळी) हक्काने घेते.

कडक उनमा, दगडेसन्या फुटती लाह्या
आइबा राबसं जंगले देवबां करस साया
काया वावरमा धवया नंदीनं औत
रात्रदिन राबनारा बाप कुनबी गावात

वडील शेतात अधिक कष्ट करत असतो. लेकरांचे आयुष्य सुखाने जावे म्हणून कष्ट उपसत असतो.

बाप मन्हा चाफा माय मन्ही चाफाकई
चाफाकईना मांडीवर, जप माल्हे लागीगई
माय माय करु माल्हे माऊलीनं येडं
बाप द्राक्षांना घड माय चारोई लागे गोड

कन्या पुत्रास माता पिता दोन्ही सारखीच महतीची मौलिक वाङ्:मयातील लेकीनं मातेचा महिमा जसा अवर्णिय महतीने गाईला आहे. तसाच पिताही लेकीची खटखटी जीवन पाहून पिता दुःखी होतो.

पिता कसा म्हने, लेकी खोबरानी वाटी
कुशीत घरानं चंदरजोतनी झायी माटी
पिता कसा म्हण्ने लेकी तुन्ही खटपट
शेवायनी ईट पाय ठेव बळकट

लेकीचं दुःख ओळखतो पित्यास कठोर हृदयी म्हटले जाते. लेकीचं जीवन सुखी व्हावं सुधरावं म्हणून पिता धैर्याने अनेक प्रयत्न करतो. सासरी प्रतिकूल वातावरणात जगणारी लेकीकडे पाहून पित्याचं पितृहृदय कुरतडत असतं

लेकी चंदरकला रुसनी बापवर
कोल्हापूरी साडी ठेये बाकवर
पिता कसा म्हने लेकी चंद्रकला आनसु
लाडकी लेकीबाई तुन्हा रुसवा काढसू

पिता आपल्या लाडक्या मुलीचे लाडाकोडाने हौसेने देणं घेणं करीत असतो.

मन्यार रे भाऊ नको फिरु खेडे पाडे
मना पिताना वाडाम्हा पचीस रुप्या रोज पडे
मन्यार रे भाऊ चुडा लय हुना हुना
मन्हा पिताना वाडाम्हा चुडा भरती सासू सुनां

कासार मन्यार यांना पित्याच्या वाड्यात पोटभर मजूरी मिळते दुसऱ्या ओवीत स्त्री म्हणते.

आईबानी दिन्ह्या लेकी न्हई देखिलं घरदार
सुर्या सारखा जेठ मन्हा चंद्रासारखा भरतार
पितानी दिन्ह्या लेकी न्हई देखात डागिना
भरेल सभा म्हजार, जवाई दिखे नगिना
आईबानी दिन्ह्या लेकी न्हई देखि खेतीवाडी
सोना सारका जीव मन्हा माटी सारका व्हनं पडी

पित्याने दिल्या घरी आहे त्या परिस्थितीत मी समाधानाने राहायचे आहे. कष्टालाही आपलसं करावं लागणारं आहे तरी हृदयी पिताजी बद्दल आदर आहे. पिता आपल्या लेकीला म्हणतो चार गोष्टी ध्यानात घे

पिता कसा म्हने सम्मायबाई म्हनी बानी
जाऊ नको देजो मन्हा पगडी नं पानी ।।
पिता कसा म्हने लेकी मर्जीन ऱ्हायजो
दर्जाना भाईर घोय मिरीना सोड जो ।।
पिता कसा म्हने लेकी नावले मरजो
पाट पोट झाकी, पानी तापीनं व्हायजो ।।

बाप लाडाच्या कन्येला लग्न होऊन सासरी जाते तेव्हा लेकीला समाज रितीरिवाजाला धरुन वागणं, चालनं, मर्जीनं राहायला सांगतो. तुझ्या वागण्यावर पित्याची पगडीचा सन्मान अवलंबून राहणार आहे. अशी अनेक अहिराणी ओवीगीते स्त्रिया गातांना दिसून येतात.

खानदेशात सण उत्सवाचे स्थान अतिशय महत्वपूर्ण आहे. या सण उत्सवामुळे त्यांची मने आनंदीत होतात. एवढेच नव्हे तर सण उत्सवाच्या निमित्ताने लोकांनी एकत्र येवून आनंद उपभोगण्याची परंपरा आहे. दैनंदिन जीवनातील व्याप, कटकटी, दुःखे बाजूला सारुन लोकांनी एकत्र यावे हा विचार सणाच्या आणि उत्सवाच्या निमित्ताने दिसून येतो. ठराविक

कालावधीत या सणाची आणि उत्सवाची निर्मिती झालेली दिसून येते. खानदेशात अनेक सण आणि उत्सव साजरे केले जातात. त्यामुळे खानदेशातील लोकांना आनंद निश्चित मिळतो.

पाची कुंड्यावरी कुंड्यावरी नागीन पसरली
तठे मनी गौराई गौराई काय काय इसरनी
तठे मनी गौराई गौराई तोडा इसरनी
तोडासले लई गया चोर लई गया चोर

तसेच राखी पोर्णिमेचा सण सुध्दा संपूर्ण देशात मोठा उत्साहाने साजरा केला जातो. हा सण खानदेशात सुध्दा साजरा केला जात असतो. राखी पोर्णिमेच्या दिवशी बहिण भावाला राखी बांधते त्यांच्यावरील प्रेम व्यक्त करते.

लाखी पुनीले बहिनी उन्यात माहेरले
ओवाळी आरती लाखी बांधस भाऊले
रान मझार हाल झायात गोपी चंदना
तोंड मझार शब्द ल्हेस चंपा बहिनीना
डोळामा आसू दुःख सांगस वहिनीले
ओवाळी आरती लाखी बांधस भाऊले
लाखी पुनीले बहिणी उन्यात माहेराले.

अशा पध्दतीने दिवाळी दसऱ्याच्या सणाच्या निमित्ताने भाऊ बहिणीला घ्यायला आला परंतू बहिणीला माहेरी पाठवतील किंवा नाही या शंकेने तो केविलवाणा होऊन बसला आहे. बहिणीला घ्यायला जाणे ही लोकरुढी आहे.

दिवाळीच्या दुसऱ्या गीतात आपल्याला दिसते
दिवाईना रोज भाऊ उना
दिवाईना रोज भाऊ उना मना बंडखोर ।। ध्रु।।
डावा डोया लये मना
मना मनले लागा छंद
भाऊ माले भेटना गोपीचंद

नवरात्री निमित्त सुध्दा स्त्रियांची लोकगीते प्रसिध्द आहेत.

टाकी लाई खडक फोडा माय खडक फोडा
तठीन निघना धवळा घोडा माय धवळा घोडा ।।धृ ।।
धवळा घोडा हबकना माय हबकना
कोना दारसे थबकना माय थबकना

लग्नविधी प्रसंगी सुध्दा स्त्री लोकगीते मोठ्या उत्साहाने गायली जात असतात. लग्नविधीत अनेक प्रसंगी गाणी म्हणण्याची प्रथा लोकजीवनात रुढ आहे.

हयद दयतां पिंड पडे हयद दयता पिंड पडे
आरे नवरदेव भाऊ तुले हयद लावता तेज चढे ।।

तसेच लग्नात स्त्रिया असेही गीते म्हणतात.

धुया शहरो तुने जाना
भारी हलदी लाना

छोटा लाडाना अंगे पेहनाना
पेनाना वही तो पेहना देना
निभाना वही तो निभा लेना
सोडा बाटलीना नाद मना
मन मा ऊना

तसेच लग्नात मस्करी गीते सुध्दा स्त्रिया गात असतात.

चहा चहा करु व च्याहले नही पानी
याहीन मोठी बानी व चहा घ्या चहा
चहा चहा करु व च्याहले नही दूध
याहीनले नही सूद व चहा घ्या चहा
चहा चहा करु व च्याहले नही साखर
याहीन मोठी बाख्खर व चहा घ्या चहा

तसेच धार्मिक विधी प्रसंगी सुध्दा स्त्रिया लोकगीते म्हणतांना दिसतात. कानबाई, आदिमानवाची प्राचीनतम रुपातली आदिमाया आहे.

खानदेशनी आई व माता
खेलरी कानबाई झालरियाँ
मांडव मझार हूल उठनी व साजनी
खानदेशनं माहेर आंबे उनी व साजनी
किती इनत्या करु माय तुले
डोया भूकेला तुन्ह रुप देखाले

अशा पध्दतीने खानदेशातील अहिराणी स्त्रीगीतांचा विचार केला असता या गीताच्या माध्यमातून समाजात एक आदर्श मुल्य संस्कार या गीताच्या माध्यमातून होतांना दिसतो. म्हणून स्त्रियांच्या या गीतांचा मौखिक वारसा जतन करुन संवर्धन केले पाहिजे.

संदर्भग्रंथ :-

१) खानदेशातील स्त्रीगीते एक चिकित्सक अभ्यास- डॉ. उषा व्ही. सावंत
२) अहिराणी लोकगीतातील लोकतत्व, ईहवाद, लोकभाषा - प्रा. डॉ. म. सु. पगारे
३) अहिराणी साहित्य सोनियाच्या खाणी - डॉ. उषा व्ही. सावंत